**संपले आहे आज नाते जगाशी**

ओघळत्या आसवांची वाट थांबते कुठेशी
संपले आहे आज नाते जगाशी ||

मुक्त केला भाव कल्लोळ तो मनातील
जसा लावा-रस ज्वालामुखीतील
कवटाळला पर्णहीन वृक्ष तो उराशी
संपले आहे आज नाते जगाशी ||

स्मृतींनो, नका साद घालू आता
अनोळखी वाटेत पाऊल टाकता
थांबवू नका मला सावलीशी
संपले आहे आज नाते जगाशी ||

जखम ही ओली अशीच वाहणार
चिरकाल जगाची ही रीत राहणार
बसणार कोण, किती पेटत्या चितेशी ?
संपले आहे आज नाते जगाशी ||

**----संध्या रानडे**